॥ या विद्या वा विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/२९३ दिनांक १८/१२/२०२४

## परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: सन २०२४–२५ मधील "Youth for My Bharat" व "Youth for Digital Literacy" या थीम वर विशेष शिबीरे आयोजन करीत असतांना खालीलपणे नमुद निर्देशांचे पालन करून शिबीरांचे आयोजन करणे बाबत.

संदर्भ: १) मा. राज्यसंपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय मुंबई यांचे जा.क्र. रासेयो–२०२४/प्र.क्र.७४/रासेयो कक्ष दिनांक २८ ऑक्टोबर २०२४.
२) दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित १ दिवसीय कार्यशाळा.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये मा. राज्यसंपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय, मुंबई यांनी सन २०२४–२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत वार्षिक सात दिवसीय विशेष शिबीरांचे आयोजन दिनांक ०१/११/२०२४ ते ३१/०१/२०२५ या कालावधीमध्ये आयोजन करण्याबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने सन २०२४–२५ मध्ये विशेष शिबीरांचे आयोजन करत असताना या वर्षासाठी रासेयो कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात आलेली थीम "Youth for My Bharat" व "Youth for Digital Literacy" ची अमंलबजावणी करावी. ज्या महाविद्यालयाचे माय भारत Registration झाले आहे, त्यांनी My Bharat Portal वर activities Event तयार करून Upload करावेत. तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी विहित मुदतीत विशेष शिबिरे आयोजित करण्यात यावेत असे कळविले आहे. या शिबीरांमध्ये गाव स्तरावर शोष खड्डे/पाझर खड्डे तयार करणे, बाल विवाह रोखण्यासाठी समाज प्रबोधन करणे, शिबिरातील सहभागी युवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुला–मुलींची अनेमिया (रक्तक्षय) बाबत तपासणी करणे इत्यादी विशेष कृती कार्यक्रम राबविण्यात यावेत. तसेच पाणी संवर्धनासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे राबविण्यात येत असलेल्या YEWS या कार्यक्रमांतर्गत WHY WASTE YEWS मोबाईल App वरती शिबिरार्थिंची नोंदणी करून घेण्यात यावी. विशेष सात दिवसीय शिबिर संपन्न झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल सोबत जोडलेल्या नमुन्यात रासेयो क्षेत्रीय संचालनालय व रासेयो मंत्रालयास पाठविण्या बाबत कळविले होते.

तथापी दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित १ दिवसीय कार्यशाळेत डॉ. निलेश पाठक, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय, मुंबई व श्री अजय शिंदे, क्षेत्रीय निदेशक, रा.से.यो. पुणे यांनी दिनांक ०१/११/२०२४ ते ३१/०१/२०२५ या कालावधीमध्ये आयोजन करीत असतांना खालील प्रमाणे निर्देशित केलेले आहे.

१) केंद्र शासना मार्फत महाराष्ट्रातील प्रत्येक गावाला १० शोष खड्ड्यांचे अनुदान केंद्र शासनाकडून देण्यात आलेले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शैक्षणिक वर्ष २०२४–२५ विशेष वार्षिक शिबिराच्या माध्यमातून दत्तक गावात स्वच्छ भारत मीशन अंतर्गत जलसंवर्धनासाठी युवकांचा सहभाग म्हणून शोषखड्डे वरती काम करणं आवश्यक आहे तसेच प्रत्येक जिल्हास्तरावर प्रोजेक्ट डिरेक्टर (वॉटर सॅनिटायझेशन) आहे. रिसोर्स पर्सनस् ची यादी मागणी करावी. त्या रिसोर्स प्रसन्ना एक दिवस आपल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरामध्ये व्याख्यानासाठी निमंत्रित करावे. ग्रामसेवकाकडून सदरील यादी घेणे आणि गावातील किती घरांना अनुदान मिळालेले आहे अशाच घरातील व्यक्तींना भेटून शोषखड्डा करण्यासाठी गावक–यांना प्रेरित करावे. वार्षिक शिबीराचा अहवाल देत असतांना दत्तक गावामध्ये किती शोषखड्डे करण्यात आले याची संख्या अहवालात देण्यात यावी. तसेच अनेमीया मुक्त भारत व बाल विवाह यांचा समावेश विशेष वार्षिक शिबीरात करावा.

पेज नं.–२

२) पी. एफ. एम. एस. मध्ये महिन्यातून किमान एक वेळेस पासवर्ड टाकून लॉग ईन करणे.

३) प्रत्येक महाविद्यालयाने व विद्यापीठाने माय भारत पोर्टलवर नॉलेज इन्स्टिट्यूशन म्हणून रजिस्ट्रेशन करावे.

४) ज्या महाविद्यालयाचे नाव माय भारत पोर्टल वरती दिसत नाही, अशा महाविद्यालयांनी "Others" क्लिक करून त्यांच्या महाविद्यालयाचे नाव Add करू शकतात.

५) यापुढे माय भारत पोर्टलवर रजिस्ट्रेशन केल्याशिवाय अनुदान मिळणार नाही तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे अनुदान हे माय भारत पोर्टलला लिंक होणार आहे असे कळवण्यात आले.

६) महाविद्यालयातील सर्व रा.से.यो. स्वंयसेवकांची व १५ ते २९ वर्षे वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांनी "Why Waste" ॲप डाउनलोड करून "YEWS" वर नोंदणी करून पाण्याचा योग्य व काटकसरीने वापर करण्याबाबत जनजागृती करावी.

७) माय भारत पोर्टल वर नवीन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिका— यांचे रजिस्ट्रेशन करावे.

८) आपल्या विद्यापीठातील चार जिल्यातील लातूर—३४०८ (PO—६१), नांदेड— २०८२ (PO—३८), परभणी—१७९७ (PO—२६),आणि हिंगोली—१५९६ (PO—१९),फक्त एवढीच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे व कार्यक्रमाधिकारी यांचे माय भारत पोर्टल वरती रजिस्ट्रेशन झालेले आहे.

९) प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या विद्यार्थ्यांकडून "सक्सेस स्टोरी" लिहून पाठवावी. यामध्ये बिफोर व आफ्टर चे फोटो पाठवावे. यामध्ये विषयाचे बंधन नाही. सर्व विषयावरती आपली सक्सेस स्टोरी पाठवू शकतात. आलेल्या सक्सेस स्टोरी एकत्र करून राज्यस्तरीय पुस्तक स्वरूपामध्ये प्रकाशित करण्यात येणार आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की उपरोक्त पणे निर्देशित केलेल्या सुचनांचे काटेकोर पणे पालन करून सन २०२४—२५ मधील सात दिवसीय वार्षिक विशेष शिबीराचे दिनांक ०१/११/२०२४ ते ३१/०१/२०२५ या कालावधीत "Youth for My Bharat" व "Youth for Digital Literacy" या थीम वर आयोजन करण्यात यावे व विशेष वार्षिक शिबीराचा अहवाल राष्ट्रीय सेवा योजना विभागात सादर करत असतांना दत्तक गावामध्ये किती खड्डे करण्यात आले याची संख्या अहवालात देण्यात यावी तसेच अनेमीया मुक्त भारत व बाल विवाह यांचा समावेश विशेष वार्षिक शिबीरात करावा, ही विनंती.

**डॉ. मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

<u>प्रत माहितीस्तव:</u>

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

<u>प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:</u>

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.